**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी**

मी याव्दारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – ऋषिकेश राजाराम आहेर

माझे वय ३० वर्षे व्यवसाय शाखाधिकारी.

राहणार सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा शेंडी, ता.अकोले, जि.अहमदनगर.

**सरतपास फिर्यादी पक्षातर्फे वकील श्री.वाय.एन.पांडे यांचेमार्फत–**

१. आरोपी गोविंद गणपत मुठे हा आमच्या बँकेचा खातेदार आहे. त्यांचे आमच्या बँकेमध्ये बचत खाते क्र.३१७८१११५८२ आहे. आमच्या बँकेने गोविंद गणपत मुठे यांना त्यांचे दिनांक २९.०९.२०१५ रोजीच्या अर्जानुसार दिनांक ०५.१०.२०१५ रोजी २० पानी चेक क्र.००६८७१ ते ००६८९० चे चेक बुक दिले आहे. आमच्या बँकेने आरोपी गोविंद गणपत मुठे यांना चेक बुक दिल्याबाबतचे आमच्या बँकेकडे कॉम्प्युटर रेकॉर्डमधील संबंधित नोंदीच्या स्क्रीनशॉटची प्रत मी याकामी निशाणी ७०, अ.क्र.४ वर दाखल केली आहे. त्या प्रतीतील मजकूर खरा व बरोबर आहे.

२. मी याकामी निशाणी ७०, अ.क्र.१ वर आरोपी गोविंद गणपत मुठे यांचे आमच्या बँकेत खाते असलेबाबत बँकेतील कॉम्प्युटर रेकॉर्डमधील प्रोफाईलची प्रत दाखल केली आहे. त्या प्रतीतील मजकूर खरा व बरोबर आहे.

३. मी याकामी निशाणी ७०, अ.क्र.२ वर आरोपी गोविंद गणपत मुठे यांचा आमच्या बँकेतील कॉम्प्युटर रेकॉर्डमध्ये असणा–या सहीच्या नमुन्याची प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

४. मी याकामी निशाणी ७०, अ.क्र.३ वर आरोपी गोविंद गणपत मुठे यांचे बचत खाते क्र.३१७८१११५८२ चा दिनांक २८.०९.२०१५ ते दिनांक

२४.०१.२०२६ रोजीपर्यंतचा संगणकीकृत खाते उतारा दाखल केला आहे. तो खाते उतारा आमचे बँकेतील रेकॉर्डप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ७२** देण्यात आली.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपी पक्षातर्फे वकील श्री.ए.के.धुमाळ यांचेतर्फे–</u>**

५. मी शेंडी शाखेमध्ये एप्रिल २०२३ पासून शाखाधिकारी म्हणून कार्यरत आहे. आमच्या शाखेमध्ये माझे व्यतिरिक्त तीन कर्मचारी आहेत. आम्हा सर्व कर्मचा–यांकडे कॉम्प्युटर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ७०, अ.क्र.१, २ व ४ वरील प्रती या मोबाईलवर फोटो काढून काढल्या आहेत. त्या प्रिंट मी स्वत: काढल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या बँकेतील प्रत्येक कर्मचा–याला स्वतंत्र आयडी व पासवर्ड दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या आयडी व पासवर्डवरून कोणत्या खातेदाराचे कोणती माहिती कोणत्या कर्मचा–याने काढली आहे, हे शोधता येवू शकते.

६. बँकेमध्ये खाते उघडताना खातेदाराच्या सहीचा नमुना घेतला जातो. सही तपासण्यासाठी आमच्या बँकेमध्ये कोणीही स्वतंत्र तज्ञ व्यक्ती नेमलेला नाही. बँकेतील ज्या कर्मचा–याकडे चेक वटविण्यासाठी येतो, त्या कर्मचा–याची अगर क्लिअरिंग हाऊस मधील कर्मचारी यांची चेक वरील सही बँकेतील रेकॉर्डमधील सहीशी मुकाबला करण्याची जबाबदारी असते. चेक वरील सही व बँकेतील रेकॉर्डमधील सही मी पाहिल्यानंतर त्या सह्या एकाच व्यक्तीच्या आहेत किंवा कसे, हे मी सांगू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात केलेली सर्व कथने खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.02.04 17:47:50 +0530

(डी.एम.हिंग्लजकर)
दिनांक – ०४.०२.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,
ता.अकोले, जि.अहमदनगर.